पोलीस अधीक्षक कार्यालय,गडचिरोली,
दिनांक : २८/०७/२०१८

**वार्तापत्र**

**__‘‘नक्षलसप्ताहाच्या विरोधात शालेय विद्यार्थ्यांनी काढली शांतता रॅली’’.__**

नक्षल सप्ताह विरोधात गावक—यांनी जोरदार विरोध दर्शविला असतांना दुर्गम भागातील शाळेतील विद्यार्थ्यांनी देखील शांतता रॅली काढुन नक्षलसप्ताहाला असलेला आपला प्रखर विरोध जाहीर केला. यामध्ये उपविभाग पेंढरी अंतर्गत येणा—या पोमके गट्टा (फु) येथील शालेय विद्यार्थ्यांनी नक्षल विरोधात जोरदार घोषणाबाजी करत नक्षलवाद्यांचा बंद हाणुन पाडला.

आपल्याला नेहमीच नक्षलवाद्यांमुळे त्रास झालेला असुन आपल्या भागाचा विकास त्यांच्यामुळेच होवु शकला नाही. आपल्याकडे पायाभूत सुविधांचा असलेला अभाव याला देखील नक्षलवाद्यांची आडकाठी जबाबदार असल्याचे सांगत नक्षलवाद्यांनी पुकारलेला बंद हा आम्ही कां पाळावा? अश्या भावना रॅलीतील शालेय विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या.




“आदीवासी
जनतेचा विकास
करणा-यांच्या हत्या
कशासाठी ? ”